श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता त्रयोदशो अध्याय



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**

**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**अन्तर्यामी नारायण स्वरूप भगवान् श्रीकृष्ण, (उनके नित्य सखा) नरस्वरूप नरश्रेष्ठ अर्जुन, (उनकी लीला प्रकट करनेवाली) भगवती सरस्वती और (उन लीलाओं का संकलन करनेवाले) महर्षि वेदव्यास को नमस्कार करके जय के साधन वेद-पुराणों का पाठ करना चाहिये।**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**

**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**जिन भगवान के नामों का संकीर्तन सारे पापों को सर्वथा नष्ट कर देता है और जिन भगवान के चरणों में आत्मसमर्पण, उनके चरणों में प्रणति सर्वदा के लिए सब प्रकार के दुःखों को शांत कर देती है, उन्हीं परम -तत्वस्वरूप श्रीहरि को मैं नमस्कार करता हूं।**

**श्रीमद्भगवद्गीतायां(न्)**

**त्रयोदशोध्यायः**

**श्रीभगवानुवाच**

**इदं(म्) शरीरं(ङ्) कौन्तेय, क्षेत्रमित्यभिधीयते।**

**एतद्यो वेत्ति तं(म्) प्राहुः(हु), क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ 1॥**

**श्रीभगवान् म्हणाले अर्जुना, या शरीराला क्षेत्र असे म्हटले जाते. या क्षेत्राला जो जाणतो त्याला क्षेत्रज्ञ असे ज्ञाते पुरुष म्हणतात.**

**क्षेत्रज्ञं(ञ्) चापि मां(वँ) विद्धि, सर्वक्षेत्रेषु भारत।**

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं(यँ), यत्तज्ज्ञानं(म्) मतं(म्) मम ॥ 2॥**

हे भारता, सर्व क्षेत्रांमध्ये तो क्षेत्रज्ञ मी आहे असे जाण. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांविषयीचे जे ज्ञान तेच खरे ज्ञान असे माझे मत आहे.

**तत्क्षेत्रं(यँ) यच्च यादृक्च, यद्विकारि यतश्च यत्।**

**स च यो यत्प्रभावश्च, तत्समासेन मे श्रृणु ॥ 3॥**

ते क्षेत्र म्हणजे काय, कोणत्या प्रकारचे, त्याचे विकार कोणते,त्यात कशापासून काय होते, तसेच तो क्षेत्रज्ञ कोण व त्याचा प्रभाव काय हे मी संक्षेपाने सांगतो, ऐक-

**ऋषिभिर्बहुधा गीतं(ञ्), छन्दोभिर्विविधैः(फ्) पृथक् ।**

**ब्रह्मसूत्रपदैश्चैव, हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ 4॥**

हे क्षेत्र क्षेत्रज्ञांचे ज्ञान अनेक ऋषींनी बहुत प्रकारे विविध छंदांच्या द्वारे व कार्यकारणरूप हेतु दाखवून निश्चित केलेल्या ब्रह्मसूत्रातील पदांनीही (सूत्रांनीही) गायिलेले आहे.

**महाभूतान्यहङ्कारो, बुद्धिरव्यक्तमेव च ।**

**इन्द्रियाणि दशैकं(ञ्) च, पञ्च चेन्द्रियगोचराः ॥ 5॥**

**इच्छा द्वेषः(स्) सुखं(न्) दुःखं(म्), सङ्घातश्चेतना धृतिः ।**

**एतत्क्षेत्रं(म्) समासेन, सविकारमुदाहृतम् ॥ 6॥**

पंचमहाभूते, अहंकार,बुद्धि, अव्यक्त प्रकृति, अकरा इंद्रिये, पाच इंद्रियांचे पाच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, देहातील इंद्रियांची जुळणी, सचेतनत्व व धैर्य  इत्यादी घटक व त्यांचे विकार यांचा समुदाय असे हे क्षेत्र, संक्षेपाने सांगितले आहे.

**अमानित्वमदम्भित्व- महिं(म्)सा क्षान्तिरार्जवम् ।**

**आचार्योपासनं(म्) शौचं(म्), स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ 7॥**

**इन्द्रियार्थेषु वैराग्य-मनहङ्कार एव च ।**

**जन्ममृत्युजराव्याधि-दुःखदोषानुदर्शनम् ॥ 8॥**

अभिमानाचा अभाव, दंभ नसणे, अहिंसा, क्षमाशीलता, वागणुकीत सरळपणा, गुरुसेवा, शुचित्व, स्थैर्य, मनोनिग्रह, इंद्रियांच्या विषयांच्या ठिकाणी विरक्ती, निरहंकार वृत्ती, जन्म, मृत्यू, वार्धक्य, दुःख व रोग अशा दोषांनी युक्त असा हा देह आहे याची जाणीव असणे.

**असक्तिरनभिष्वङ्गः(फ्), पुत्रदारगृहादिषु ।**

**नित्यं(ञ्) च समचित्तत्व-मिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ 9॥**

**मयि चानन्ययोगेन, भक्तिरव्यभिचारिणी ।**

**विविक्तदेशसेवित्व-मरतिर्जनसं(म्)सदि ॥ 10॥**

अनासक्ति, स्त्री, पुत्र, गृह इत्यादीं बद्दल अंध ममत्व नसणे, इष्ट अनिष्टाच्या प्राप्तीबाबत चित्ताची समानता, माझ्याठायी अनन्यभावाने अढळ भक्ती, निवडी जागी किंवा एकांत जागी राहणे, लोकांची गर्दी न आवडणे.

अध्यात्मज्ञाननित्यत्वं(न्), तत्वज्ञानार्थदर्शनम् ।

एतज्ज्ञानमिति प्रोक्त- मज्ञानं(यँ) यदतोऽन्यथा ॥ 11॥

अध्यात्मज्ञानच नित्य आहे अशी बुद्धी असणे, व तत्वज्ञानाच्या सिध्दांताचे परिशीलन - ह्या सर्व गुणांना ज्ञान म्हणतात. आणि जे याच्या विरुद्ध दुसरे ते अज्ञान होय. हे मी तुला सांगतो.

ज्ञेयं(यँ) यत्तत्वप्रवक्ष्यामि, यज्ज्ञात्वामृतमश्नुते ।

अनादिमत्परं(म्) ब्रह्म, न सत्तन्नासदुच्यते ॥ 12॥

आता जे जाणल्याने अमृत म्हणजे मोक्ष मिळतो, असे जे ज्ञेय, ते मी तुला सांगतो.सर्वश्रेष्ठ ब्रह्म हेच ज्ञेय असून ते अनादी आहे. ते सत् किंवा असत् ही म्हणता येत नाही.

सर्वतः(फ्) पाणिपादं(न्) तत्-सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।

सर्वतः(श्) श्रुतिमल्लोके, सर्वमावृत्य तिष्ठति ॥ 13॥

त्याला सर्व बाजूंनी हात व पाय आहेत, सर्व बाजूंनी डोळे, मस्तके व मुखे आहेत, सर्व बाजूंनी कान आहेत आणि ते सर्वांना व्यापून राहिले आहे.

सर्वेन्द्रियगुणाभासं(म्), सर्वेन्द्रियविवर्जितम् ।

असक्तं(म्) सर्वभृच्चैव, निर्गुणं(ङ्) गुणभोक्तृ च ॥ 14॥

त्यात सर्व इंद्रियांच्या गुणांचा भास होत असून वस्तुतः त्याला कोणतेच इंद्रिय नाही.ते सर्वांपासून आसक्त म्हणजे अलग असूनही सर्व भूतांचे धारण पोषण करणारे आहे. ते निर्गुण आहे व गुणांसहित, गुणांचे भोक्तेही आहे.

बहिरन्तश्च भूताना- मचरं(ञ्) चरमेव च ।

सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं(न्), दूरस्थं(ञ्) चान्तिके च तत् ॥ 15॥

ते ब्रह्म सर्व भूतांच्या बाहेर आहे व आंतही आहे.ते अचल आहे आणि चलही आहे. ते सूक्ष्म असल्याने जाणण्यासाठी दुष्कर आहे. तसेच ते दूर असून जवळही आहे.

अविभक्तं(ञ्) च भूतेषु, विभक्तमिव च स्थितम् ।

भूतभर्तृ च तज्ज्ञेयं(ङ्), ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ 16॥

ते ब्रह्म अखंड असूनही सर्व प्राण्यांच्या रूपात विभागल्यासारखे दिसते. ते भूतमात्रांचे धारण-पोषण करणारे, ग्रासणारे आणि उत्पत्तीही करणारे आहे असे जाणावे.

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्- तमसः(फ्) परमुच्यते ।

ज्ञानं(ञ्) ज्ञेयं(ञ्) ज्ञानगम्यं(म्), हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥ 17॥

ते तेजांचेही तेज असून अंधाराच्या अत्यंत पलीकडचे आहे असे म्हटलेजाते. ते ज्ञानरूप, ज्ञेयरूप व ज्ञानानेच कळणारे असून सर्वांच्या हृदयात वसते.

इति क्षेत्रं(न्) तथा ज्ञानं(ञ्), ज्ञेयं(ञ्) चोक्तं(म्) समासतः ।

मद्भक्त एतद्विज्ञाय, मद्भावायोपपद्यते ॥ 18॥

याप्रमाणे क्षेत्र, तसेच ज्ञान व ज्ञेय यांचे संक्षेपतः वर्णन केले. हे जाणण्याने माझा भक्त माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो.

प्रकृतिं(म्) पुरुषं(ञ्) चैव, विद्ध्यनादी उभावपि ।

विकारां(म्)श्च गुणां(म्)श्चैव, विद्धि प्रकृतिसम्भवान् ॥ 19॥

प्रकृति( जड पदार्थ) व पुरुष( चैतन्य) हे दोन्ही अनादी आहेत असे जाण आणि रागद्वेषादि विकार व गुण हे प्रकृतिपासून उत्पन्न होतात असे समज.

कार्यकरणकर्तृत्वे, हेतुः(फ्) प्रकृतिरुच्यते ।

पुरुषः(स्) सुखदुःखानां(म्), भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ 20॥

कार्ये, करणे व कर्तृत्व यांस मूळ प्रकृति कारण असते व सुखदुःखांच्या भोगाला पुरुष कारण असतो असे म्हणतात.

पुरुषः(फ्) प्रकृतिस्थो हि, भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।

कारणं(ङ्) गुणस(ङ्)गोऽस्य, सदसद्योनिजन्मसु ॥ 21॥

पुरुष प्रकृतिमध्ये समरस होतो आणि त्यामुळे प्रकृतिनिर्मित गुणांचा उपभोग घेतो. मग ज्या ज्या गुणांशी त्याचा संबंध येतो त्याप्रमाणे चांगल्यावाईट अशा योनींमध्ये तो जन्मास येतो.

उपद्रष्टानुमन्ता च, भर्ता भोक्ता महेश्वरः ।

परमात्मेति चाप्युक्तो, देहेऽस्मिन्पुरुषः(फ्) परः ॥ 22॥

अशा या शरीरातला आत्मा हा खरे पाहू जाता निर्विकार परमात्माच आहे. तो साक्षी आहे म्हणून 'उपद्रष्टा' व संमती देतो म्हणून 'अनुमंता', धारण व पोषण करतो म्हणून 'भर्ता', सर्व देवांचा स्वामी म्हणून 'महेश्वर' आणि शुद्ध असल्यामुळे 'परमात्मा' असे त्याला म्हणतात.

य एवं(वँ) वेत्ति पुरुषं(म्), प्रकृतिं(ञ्) च गुणैः(स्) सह ।

सर्वथा वर्तमानोऽपि, न स भूयोऽभिजायते ॥ 23॥

अशा रीतीने पुरुषाला व त्रिगुणमयी प्रकृतीला जो मनुष्य तत्त्वरूपाने जाणतो, तो जरी कर्तव्य कर्मे निभावतो आहे असे वरवर दिसले तरीही पुन्हा जन्म पावत नाही.

ध्यानेनात्मनि पश्यन्ति, केचिदात्मानमात्मना ।

अन्ये साङ्ख्येन योगेन, कर्मयोगेन चापरे ॥ 24॥

अशा या परमात्म्याला कुणी ध्यानाच्या द्वारे स्वतः मध्ये पाहतात, कुणी ज्ञानयोगाच्या द्वारे तर आणखी कुणी कर्मयोगाच्या द्वारे पाहतात अर्थात त्याचा साक्षात्कार अनुभवतात.

अन्ये त्वेवमजानन्तः(श्), श्रुत्वान्येभ्य उपासते ।

तेऽपि चातितरन्त्येव, मृत्युं(म्) श्रुतिपरायणाः ॥ 25॥

परंतु एवढीही कुवत अंगी नसणारे इतर लोक ज्ञानी गुरुंकडून हे ज्ञान (उपदेश) श्रवण करतात आणि त्यावर नितांत श्रद्धा ठेवून उपासना करून व मृत्यूला पार करून निघून जातात.

यावत्सञ्जायते किञ्चित्- सत्त्वं(म्) स्थावरजङ्गमम् ।

क्षेत्रक्षेत्रज्ञसं(यँ)योगात्-तद्विद्धि भरतर्षभ ॥ 26॥

हे भरतश्रेष्ठा! या ब्रह्मांडातील स्थावर आणि जंगम (स्थिर व चर) अशा प्रत्येक गोष्टीची निर्मिती ही क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्या मीलनातूनच होत असते हे तू समजून घे.

समं(म्) सर्वेषु भूतेषु, तिष्ठन्तं(म्) परमेश्वरम् ।

विनश्यत्स्वविनश्यन्तं(यँ), यः(फ्) पश्यति स पश्यति ॥ 27॥

परमेश्वर सर्व भूतांच्या अंतर्यामी समान असा असतो आणि सर्व चराचर (साकार सृष्टी) जरी नष्ट झाली तरी तो मात्र अविनाशी असा तो असे जो पाहतो (अनुभवतो) तोच खऱ्या अर्थाने पाहतो.

समं(म्) पश्यन्हि सर्वत्र, समवस्थितमीश्वरम् ।

न हिनस्त्यात्मनात्मानं(न्), ततो याति परां(ङ्) गतिम् ॥ 28॥

जो मनुष्य ईश्वराला सर्वत्र सारखा भरून राहिला आहे असे समबुद्धिने पाहतो तो मग आपणच आपला घात करून घेत नाही आणि त्यामुळे तो परमगतीला जातो (निर्वाणपदी जातो).

प्रकृत्यैव च कर्माणि, क्रियमाणानि सर्वशः ।

यः(फ्) पश्यति तथात्मान-मकर्तारं(म्) स पश्यति ॥ 29॥

सर्व ब्रह्मांडात चालू असणाऱ्या घडामोडी या प्रकृतीच घडवते आहे आणि त्यात आत्म्याचा काही संबंध नाही असे जाणून त्याला अकर्ता असा जो अनुभवतो तोच खरा अनुभवी होय.

यदा भूतपृथग्भाव-मेकस्थमनुपश्यति ।

तत एव च विस्तारं(म्), ब्रह्म सम्पद्यते तदा ॥ 30॥

सर्व भूतमात्र वेगवेगळे भासत असले तरीही एका आत्म्यातच स्थित आहे आणि आत्म्यामधून सर्व विश्व विस्तारले आहे असे जेव्हा दिसते तेव्हा ब्रह्मपद प्राप्त होत असते.

अनादित्वान्निर्गुणत्वात्-परमात्मायमव्ययः ।

शरीरस्थोऽपि कौन्तेय, न करोति न लिप्यते ॥ 31॥

कौंतेया ! हा जो परमात्मा आहे तो अनादि आणि निर्गुण आहे म्हणून तो निर्विकार आहे. जरी तो शरीरात असला तरी तो निष्क्रिय म्हणजेच अकर्ता आहे. त्यामुळे त्याला कर्मांचे बंधन असे कधी पडत नाही, हे कसे ते ऐक.

यथा सर्वगतं(म्) सौक्ष्म्या-दाकाशं(न्) नोपलिप्यते ।

सर्वत्रावस्थितो देहे, तथात्मा नोपलिप्यते ॥ 32॥

आकाश अतिसूक्ष्म असल्यामुळे जसे कुठेही लिप्त होत नसते. तसाच त्यापेक्षाही सूक्ष्म असलेला आत्मा सर्व देहांत असूत सुद्धा देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही.

यथा प्रकाशयत्येकः(ख्), कृत्स्नं(ल्ँ) लोकमिमं(म्) रविः ।

क्षेत्रं(ङ्) क्षेत्री तथा कृत्स्नं(म्), प्रकाशयति भारत ॥ 33॥

अरे भारता! एकटा सूर्य सर्व चराचराला ज्या प्रकारे प्रकाशित करतो त्याचप्रमाणे हा एकटा क्षेत्रज्ञ आत्मा या यच्चयावत क्षेत्राला प्रकाशित करतो.

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेव-मन्तरं(ञ्) ज्ञानचक्षुषा ।

भूतप्रकृतिमोक्षं(ञ्) च, ये विदुर्यान्ति ते परम् ॥ 34॥

अशा तऱ्हेने क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यातील फरक तसेच प्रकृती व तिचे कर्तृत्व (जगत्) यांच्यापासून मुक्त होण्याचा मार्ग जे जाणतात तेच परमपद प्राप्त करतात.

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि

श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे

श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥

वह सच्चिदानंदघन परब्रह्म सभी प्रकार से सदा सर्वदा परिपूर्ण है। यह जगत भी उस परमात्मा से पूर्ण ही है, क्योंकि यह पूर्ण उस पूर्ण पुरुषोत्तम से ही उत्पन्न हुआ है। इस प्रकार परब्रह्म की पूर्णता से जगत पूर्ण होने पर भी वह परब्रह्म परिपूर्ण है। उस पूर्ण में से पूर्ण को निकाल देने पर भी वह पूर्ण ही शेष रहता है।